| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 16 Mar 2026 | Protecting Jewellery Through Home Insurance | Maharashtra Times |

# 'होम इन्श्युरन्स'द्वारे दागिन्यांचे रक्षण

**घर ही प्रत्येकासाठी सुरक्षिततेची आणि जिव्हाळ्याची जागा असते. मात्र, आग, पूर, चोरी किंवा इतर अनपेक्षित घटनांमुळे घर आणि त्यातील मौल्यवान वस्तूंना धोका निर्माण होऊ शकतो. अशा वेळी 'होम इन्श्युरन्स' हे घर आणि संपत्तीचे संरक्षण करणारे प्रभावी आर्थिक सुरक्षाकवच ठरते.**




गुरदीपसिंह बत्रा
matawealth
@timesofindia.com


आपले घर ही प्रत्येकासाठी हक्काची जागा असते, जिथे प्रत्येक जण स्वतःला अत्यंत सुरक्षित मानतो. घरात आपण मौल्यवान वस्तू जपून ठेवतो. त्यामध्ये दागिने, मौल्यवान पेंटिंग, प्राचीन शैलीतील फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि घरातील अन्य वस्तूंचा समावेश होतो. अशा आपल्या प्राणप्रिय घरासाठी आणि घरातील सर्व मौल्यवान वस्तूंसाठी 'होम इन्श्युरन्स' सुरक्षाकवच ठरू शकते, हे तुम्हाला ठाऊक आहे का? 'होम इन्श्युरन्स' हे एक महत्त्वाचे वित्तीय साधन आहे. घराचे आणि घरातील सामानाचे संरक्षण करण्यासाठी 'होम इन्श्युरन्स' हा नेमका विश्वासार्ह मार्ग कसा ठरतो, हे आता जाणून घेऊ या...

'होम इन्श्युरन्स पॉलिसी' तुमच्या प्रॉपर्टी इन्श्युरन्सचाच एक भाग आहे. या पॉलिसीमध्ये घराची रचना आणि त्यामधील सामान अशा दोन्ही गोष्टींचे संरक्षण दिले जाते. इन्श्युरन्स घेतलेल्या घराच्या रचनेचे किंवा त्यातील सामानाचे अचानक उद्भवलेल्या संकटामुळे (विशेषतः अपवाद म्हणून वगळले नसल्यास) नुकसान, हानी किंवा विध्वंस झाल्यास इन्श्युरन्स कंपनीकडून नुकसानभरपाई दिली जाते. नुकसानभरपाई ही एकतर संमत मूल्यानुसार किंवा प्रत्यक्ष नुकसानीच्या आधारावर निश्चित केली जाते. यामध्ये घराची पुर्नबांधणी किंवा दुरुस्तीचा खर्च समाविष्ट असतो.

कोणताही मालक-रहिवासी त्यांचे फ्लॅट, अपार्टमेंट किंवा इमारतीसाठी आणि त्यातील सामानासाठी 'होम इन्श्युरन्स' घेऊ शकतो. भाडेकरू केवळ त्यांच्या घरातील सामानाचा इन्श्युरन्स काढू शकतात. याशिवाय, संस्था किंवा कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांचे किंवा व्यवसाय भागीदारांचे घर आणि त्यातील सामान इन्श्युरन्सच्या कक्षेत आणू शकता. सर्वसमावेशक 'होम इन्श्युरन्स' पॉलिसी अनेक प्रकारच्या आकस्मिक संकटांपासून संरक्षण प्रदान करते. सुलभपणे जाणून घेण्यासाठी अशा जोखमींची तीन प्रकारे वर्गवारी केली जाऊ शकते.

- **नैसर्गिक जोखीम :** यामध्ये आग, वीज पडणे, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, वादळे, पूर आणि पाणी साचणे यांसारख्या घटनांमुळे होणाऱ्या नुकसानीचा समावेश होतो. याशिवाय जंगलातील वणवा, जमिनीची धूप, भूस्खलन आणि दरडी कोसळणे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींपासूनही संरक्षण मिळते.
- **मानवी कृती :** यामध्ये बाह्य वस्तूंच्या आघातामुळे होणारे नुकसान, दंगली, संप किंवा दहशतवाद यांसारख्या मानवी कृतींमुळे घराचे नुकसान झाल्यास हे संरक्षण लागू होते. महत्त्वाचे म्हणजे अशा एखाद्या घटनेनंतर सात दिवसांत चोरी झाल्यास त्याचीही भरपाई मिळते.
- **यंत्रणेतील बिघाड :** पाणी टाकी किंवा पाइप फुटणे, गळती होणे; तसेच घरातील उपकरणे आणि ऑटोमॅटिक वॉटर स्प्रिंकलर यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी संरक्षण दिले जाते. या वर्गवारीमुळे ग्राहकांना अजिबात काळजी करण्याची गरज भासत नाही. कारण तुमचे घर आणि सामान सर्वार्थाने सुरक्षित असल्याची तुम्हाला संपूर्णपणे खात्री मिळते.

## दागिने आणि मौल्यवान वस्तूंचे संरक्षण

'होम इन्श्युरन्स'मध्ये दागिन्यांचे आणि मौल्यवान वस्तूंचे एक ठरावक मूल्य निश्चित केले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण संरक्षण होते. हे मूल्य निर्धारित करण्यासाठी खरेदीची मूळ पावती किंवा तज्ज्ञांकडून मिळालेला 'व्हॅल्युएशन रिपोर्ट' यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. एकदा इन्श्युरन्स घेतल्यावर तुमचे दागिने आणि मौल्यवान वस्तू संपूर्ण देशभर सुरक्षित राहतात. मग ते हरवले किंवा त्यांचे काही कारणाने नुकसान झाले, तरी संपूर्ण संरक्षण प्राप्त होते. तुम्ही काही अतिरिक्त प्रीमियम देय केल्यास संरक्षणाच्या कक्षा जगभरासाठी विस्तारतात. मौल्यवान वस्तू घरी किंवा देशात किंवा परदेशात तुमच्या सोबत असल्यास; पॉलिसीच्या अटींच्या अधीन कोणत्याही प्रकारच्या अपघाती नुकसानीपासून किंवा हरवण्यापासून नेहमीच सुरक्षित राहतील.

## घरफोडी विमा संरक्षण

काही सर्वसमावेशक 'होम इन्श्युरन्स पॉलिसी'मध्ये हे वैशिष्ट्य आधीच समाविष्ट असते. काही बाबतीत स्वतंत्रपणे खरेदी करून मूळ पॉलिसीमध्ये समाविष्ट करू शकता. तुमच्या प्रॉपर्टीमधील सामानाची चोरी किंवा घरफोडीच्या घटनेत हे वैशिष्ट्य आर्थिक संरक्षण प्रदान करते. यामध्ये चोरीच्या प्रयत्नात झालेल्या नुकसानीचीही भरपाई मिळते. पॉलिसी घेताना तुमच्या अखत्यारीतील सर्व बाबींची योग्यपणे माहिती दिल्यास ही पॉलिसी घरफोडीच्या जोखमींपासून (निवड केल्यास चोरीसह) अधिक संरक्षण देते.

## पॉलिसी खरेदी करण्याची प्रक्रिया

'होम इन्शुरन्स'ची प्रक्रिया अत्यंत सोपी आहे आणि यामुळे तुम्हाला सुखद मानसिक शांतता मिळते.

- थेट इन्श्युरन्स कंपनीच्या वेबसाइटला भेट देऊ शकता आणि उपलब्ध पॉलिसी पर्यायांची माहिती मिळवून 'होम इन्श्युरन्स' खरेदीच्या प्रक्रियेला सुरुवात करू शकता. तुमच्या मनात काही शंका असल्यास स्पष्टीकरणासाठी वेळोवेळी 'कस्टमर सर्व्हिस' टीम सोबत संपर्क साधू शकता.
- अधिक माहितीसाठी तुमच्या इन्श्युरन्स सल्लागाराशी, बँकेशी किंवा इन्श्युरन्स कंपनीशी चर्चा करणे हा एक सोपा आणि सर्वोत्तम उपाय आहे. संरक्षणाचे स्वरूप, मिळणारे लाभ आणि प्रीमियमचा तपशील समजून घ्या.
- एकंदरीत खर्च आणि इन्श्युरन्समधून वगळलेल्या बाबींची नीट माहिती घ्या; जेणेकरून नेमके किती शुल्क भरायचे याची स्पष्टता येईल.
- कोणतीही चूक होऊ नये म्हणून 'प्रपोजल फॉर्म'मधील सर्व माहिती नीट वाचून आणि लक्षपूर्वक भरा.
- दागिने आणि मौल्यवान वस्तूंचे फोटो काढून ठेवा; तसेच त्यांची खरेदीची बिले आणि पावत्या नीट सांभाळून ठेवा.
- भरलेला 'प्रपोजल फॉर्म', घराचा ताबा असल्याचा पुरावा, संरक्षित करायच्या वस्तूंची यादी, त्यांची खरेदीची बिले आणि 'व्हॅल्युएशन रिपोर्ट' ही कागदपत्रे एकत्रित सादर करा.
- 'प्रीमियम' वेळेवर भरल्याची खात्री करा. तुमचे पेमेंट पूर्ण झाल्याशिवाय संरक्षण मिळत नाही.
- अर्जाच्या मंजुरीनंतर पॉलिसी शेड्यूल आणि अधिकृत कागदपत्रे तुम्हाला मेलद्वारे मिळतील.


**(लेखक बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडचे 'रिस्क इंजिनीअरिंग' आणि ग्लोबल अकाउंट्स विभागाचे प्रमुख आहेत.)**